# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

# LIBRARY DEPARTMENT

# ATR 2020-21

---

## BEST PRACTICE 2020-21

### Dr.A.P.J.Abdul Kalam Birth anniversary 2020
### Reading Inspiration Day (Wachan Prerana Din)

In this programme thought provoking speech gave by Dr. Jayprakash Dargad (Principal, Dayanand Science College, Latur ) on “Let us talk on the books” (Pustak Vachan Anand dai Pravas) on **15/10/2020**. This type of programme is organized to encourage students and Teacher to read and use the library resources to develop themselves**.**














## सूचना :–

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच प्रशासकीय कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस ''वाचन प्रेरणा दिन'' म्हणून ग्रंथालय विभाग साजरा करीत आहे.

''वाचन प्रेरणा दिन'' या विषयावर मा.प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड सर यांचे व्याख्यान गुरुवार दि.१५ ऑक्टोबर २०२० रोजी स.११.०० वा. हॉल नं.१६ येथे आयोजित केले आहे.

तरी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित रहावे.

Librarian
Dayanand College Of Commerce.Latur

प्राचार्य
दयानंद वाणिज्य महाविद्यालय
लातूर

---

स्थापना वर्ष : १९६१
स्वतंत्र : १९७०
नॅक रिॲक्रिडीटेड : बी ग्रेड

दूरध्वनी क्र.: (०२३८२) २२१३४९, २२१६०२
फॅक्स क्र. : (०२३८२) २२१६०२
ई-मेल : dcomm@rediffmail.com

### दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर

(संलग्नित- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड)

लक्ष्मीरमण लाहोटी, अध्यक्ष — रमेश बियाणी, सचिव — डॉ.श्रीराम सोळंके, एम.कॉम, एल.एल.बी., एम.फिल्., पीएच.डी., प्राचार्य

जा.क्र./ग्रंथा/ M1/2020-21/204 — दि.१५/१०/२०२०

प्रति,
डॉ.जे.एस.दरगड
मा.प्राचार्य
दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर

महोदय,

भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त गुरूवार दि.१५ ऑक्टोबर २०२० रोजी ग्रंथालय विभाग आयोजित ''वाचन प्रेरणा दिन'' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास आपण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांस बहुमूल्य असे मार्गदर्शन केलेत, याबद्दल महाविद्यालय परिवाराच्या वतीने आपले आभार...!

भविष्यात आपले असेच सहकार्य मिळावे ही विनंती.

धन्यवाद!!

ग्रंथपाल
Librarian
Dayanand College Of Commerce.Latur

प्राचार्य
प्राचार्य
दयानंद वाणिज्य महाविद्यालय
लातूर

---

पुण्यनगरी

# ज्ञान ही मोठी शक्ती: प्राचार्य दरगड



**लातूर / प्रतिनिधी**

आज मनुष्यात असणारे ज्ञान ही त्याची फार मोठी शक्ती आहे. या शक्तीच्या साह्याने तो समृद्ध व प्रगल्भ तर होतोच. पण त्यांच्या कार्यसंस्कृतीवर सुद्धा त्याचा प्रभाव पडतो. मागच्या पिढीपेक्षा आताच्या पिढीचे वाचन अगदी अल्प आहे, अशी तक्रार सर्व स्तरातून वाढतेय, असे मत दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश दरगड यांनी व्यक्त केले.

दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस वाचना प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके होते. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. आर. एस. पवार, प्रा. सुभाष मोरे, ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. एका पिढीतील ज्ञान दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य पुस्तके करतात. प्रत्येक शिक्षकाच्या घरी छोटेशे का होईना ग्रंथालय असावे, अशी अपेक्षा प्राचार्य दरगड यांनी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. सोळंके यांनी केला. प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले. सूत्रसंचलन प्रदीप आडसुळे तर आभार लक्ष्मीकांत वाघ यांनी मानले. कार्यक्रमास शिवरानी दुबे, डॉ. मनिषा अष्टेकर, प्रा. शशिकांत स्वामी, डॉ. एस. टी. उमाटे, अधीक्षक आर. डी. कुरे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तानाजी सुतार, ललिता शेठीया, सचिन शिंदे, कलिम शेख यांनी प्रयत्न केले.

---


बीड — मराठवाडा साथी — msathibeed@gmail.com — शनिवार दि.१७ ऑक्टोबर २०२० — पान ४

# वाचनाची आवड सवड काढून जोपासावी–प्राचार्य जयप्रकाश दरगड

### ज्ञानात सतत वाढ करण्यासाठी वाचन एकमेव मार्ग

वाचन म्हणजे जीवनाला उन्नत करणारी बाब असून यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलविण्यात वाचनाचा महत्त्वाचा वाटा असतो. यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करा. त्याचप्रमाणे जगण्याच्या परिपूर्णतेसाठी वाचन हे आवश्यक आहे. ज्ञानात सतत वाढ करण्यासाठी वाचन हा एकमेव मार्ग आहे.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालय 'वाचन प्रेरणा दिवस' साजरा



**लातूर (प्रतिनिधी)**

आज मनुष्यामध्ये असणारे ज्ञान ही त्याची फार मोठी शक्ती आहे. या शक्तीच्या साह्याने तो समृद्ध व प्रगल्भ तर होतोच परंतु त्यांच्या कार्यसंस्कृतीवर सुद्धा त्याचा प्रभाव पडतो. मागच्या पिढीपेक्षा आताच्या पिढीचे वाचन अगदी अल्प झाले आहे अशी तक्रार सर्व स्थरातून वाढते आहे. वाचन संस्कृती टिकवून धरण्यासाठी प्रत्येक माणसाचे मन सुविचार संपन्न होण्यासाठी वाचनाची आवड सवड काढून जोपासण्याचे आवाहन प्राचार्य जयप्रकाश दरगड यांनी व्यक्त केले.

दयानंद वाणिज्य महाविद्यालय ग्रंथालय विभाग आयोजित भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके तर प्रमुख उपस्थिती वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. आर. एस. पवार, प्रा. सुभाष मोरे, ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांची होती.

प्राचार्य दरगड पुढे म्हणाले, 'एका पिढीतील ज्ञान दुसऱ्या पिढीपर्यंत पोहचविण्याचे महान कार्य पुस्तके करतात'. प्रत्येक शिक्षकांच्या घरी छोटेशे का होईना ग्रंथालय असावे. विद्यार्थ्यांमध्ये वाचन वेड उत्पन्न व्हायचे असेल तर तशी परिस्थिती त्यांच्या भोवती निर्माण होणे गरजेचे आहे. पूर्वी पुस्तक मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे वाचनालय असे आज त्या वाचनालयाची जागा इंटरनेट आणि ईबुक ने घेतली आहे. ग्रंथालयाने विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक असल्याचे हि त्यांनी आवर्जून सांगितले. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक ग्रंथपाल विठ्ठल जाधव, पाहुण्याची ओळख सौ. शिवरानी दुबे, सूत्रसंचालन प्रदीप आडसुळे तर आभार लक्ष्मीकांत वाघ यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. मनीषा अष्टेकर, प्रा. स्वामी, प्रा. शशिकांत स्वामी, डॉ. एस. टी. उमाटे, अधीक्षक आर. डी. कुरे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कोविड १९ च्या नियमांचे पालन करून उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तानाजी सुतार, ललिता शेठीया, शेख कलीम, सचिन शिंदे आदींनी परिश्रम घेतले.